नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १२७ Issue - 127 | वार सोमवार दि. २३ सप्टेंबर २०२४ Blow- Monday Date 23 September 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात

### सत्यपाल मलिक यांनी घेतली उद्धव ठाकरे यांची भेट

मुंबई : जम्मू आणि काश्मीर, गोवा आणि मेघालय या राज्यांचे राज्यपाल पद भूषविलेले आणि एकेकाळी भाजपाशी संबंधित असलेल्या सत्यपाल मलिक यांनी आज शिवसेना उबाठा गटाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा आपण प्रचार करणार असून या निवडणुकीत भाजपाचा सुपडा साफ होईल, अशी प्रतिक्रिया मलिक यांनी या भेटीनंतर दिली. उद्धव ठाकरेंची भेट घेऊन बाहेर आल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना सत्यपाल मलिक म्हणाले, विधानसभा निवडणुकीत भाजपाला नुसताच फटका बसणार नाही तर या निवडणुकीत त्यांचा सुपडा साफ होईल. या निवडणुकीत उद्धव ठाकरे महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. त्यामुळे कुणाला काळजी करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरी मलिक यांनी जोरदार टीका केली.

### मंचकी निद्रेस मंगळवारपासून प्रारंभ, ३ ऑक्टोबरला घटस्थापना

धाराशिव : महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास तीन ऑक्टोबरपासून घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी देवीच्या मंचकी निद्रेस मंगळवार, २४ सप्टेंबरपासून प्रारंभ होणार आहे. तर १३ ऑक्टोबरला सिमोल्लंघनाने तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवाचा समारोप होणार आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी पूर्णपीठ असलेल्या तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाची पूर्वतयारी मंदिर प्रशासन व नगरपालिका प्रशासनाने जवळपास पूर्ण केली आहे.

# आठवडाभर राज्यात सर्वदूर पावसाचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात आठवडाभर मेघगर्जना, विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह दमदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा जोर राहणार आहे. राज्यभरात खरीप हंगामातील पिकांची काढणी सुरू आहे. ऐन सुगीत पाऊस पडणार असल्यामुळे हा पाऊस मोठा नुकसानकारक ठरणार आहे. खरिपातील शेतीमाल मातीमोल होण्याची भीती आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण म्यानमार आणि बंगालच्या खाडीत वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता वाढून, त्याची वाटचाल महाराष्ट्राच्या दिशेने होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सोमवारपासून (२३ सप्टेंबर) शनिवारपर्यंत (२८ सप्टेंबर) राज्यात सर्वदूर दमदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

### विजांच्या कडकडाटासह बरसणार पावसाच्या सरी

विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा जोर राहणार आहे. वादळी वारे, मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज असल्यामुळे नुकसानीची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे. सोमवारी राज्यभराला पावसासाठी पिवळा इशारा देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रायगड, पुणे, सोलापूर, बीड, नगर, नांदेड, हिंगोली, परभणी, चंद्रपूर आणि गडचिरोलीत मुसळधार पावसाचा अंदाज आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

दक्षिण राजस्थान, कच्छच्या काही भागातून नैऋत्य मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सोमवारपासून (२३ सप्टेंबर) सुरू होण्याची शक्यता आहे. दक्षिण राजस्थानवर हवेची प्रतिचक्रीय (प्रत्यावर्ती) स्थिती तयार झाली आहे. हवेतील बाष्पाचे प्रमाणही कमी झाले आहे. त्यामुळे सोमवारपासून नैऋत्य मोसमी वाऱ्याचा परतीचा प्रवास सुरू होण्याची शक्यता आहे. पण, कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार असल्यामुळे परतीच्या प्रवासात अडथळे येऊन परतीचा प्रवास रेंगाळण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सानप यांनी व्यक्त केली. दरम्यान राज्याच्या अनेक भागात स्थानिक पातळीवर तापमान वाढून दुपारनंतर मेघगर्जनेसह पाऊस पडू लागला आहे.

**राज्यात खरिपातील पिकांची काढणी वेगाने सुरू आहे. ऐन सुगीचे दिवस सुरू आहेत. प्रामुख्याने कडधान्ये, सोयाबीन काढणी हंगाम सुरू आहे. आठवडाभर वादळी वाऱ्यासह दमदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भ, मराठवाड्यात कापूस वेचणीला आला आहे. अनेक ठिकाणी वेचणी सुरू झाली आहे. हा कापूस भिजल्यामुळे दर्जा खालविणार आहे. सोयाबीनचे क्षेत्र ५० लाख हेक्टरहून जास्त आहे. हा सर्व सोयाबीन आता काढणीला आला आहे. मजुरांचा आणि मळणी यंत्रांचा तुटवडा आदी कारणांमुळे पाऊस पडण्याअगोदर शेतीमालाची काढणी करून सुरक्षित साठवणूक करणे शक्य नाही. त्यामुळे खरीप हंगामातील काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे.**

# चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताने जिंकलं पहिलं ऐतिहासिक सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेशने बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२४ मध्ये इतिहास घडवला आहे. अंतिम सामन्यात त्याने शानदार खेळ केला आणि भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. डी गुकेशने आता ४५व्या ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी करत संपूर्ण जगात भारताचे नाव उंचावले आहे. गुकेशने चेस ऑलिम्पियाडमधील ८ सामने जिंकले तर २ ड्रॉ सामने खेळले. संपूर्ण स्पर्धेत गुकेशने चमकदार कामगिरी करत बुद्धिबळ संघाला कायमच पाठिंबा दिला.

बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२४ मध्ये खुल्या विभागात भारताने ऐतिहासिक पहिल्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केला आहे. भारतीय संघात गुकेश डी, आर प्रज्ञानंद, अर्जुन इरिगसी, विदित गुजराथी, पेंटाला हरिकृष्ण आणि श्रीनाथ नारायणन यांचा समावेश आहे. अर्जुन इरिगसी आणि डी गुकेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनला यूएसए विरुद्ध दोन गुणांचा फटका बसल्यानंतर भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक निश्चित झाले.



भारतीय संघाने स्पर्धेची स्वप्नवत सुरुवात केली आणि गेल्या सीझनमध्ये चॅम्पियन उझबेकिस्तानविरुद्ध बरोबरी साधण्यापूर्वी पहिले आठ सामने जिंकून चॅम्पियन संघ असल्याची ग्वाही दिली. २०२२ च्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताने मायदेशात (पान २ वर...)

# ...तर दूरगामी परिणाम होतील

### लाडूप्रकरणावरून जगनमोहन रेड्डींनी पंतप्रधानांना पत्र लिहित व्यक्त केली भीती

हैदराबाद : तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूच्या प्रसादात प्राण्यांचा चरबीचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आल्याने संताप व्यक्त केला जातोय. याप्रकरणी माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्यावर टीका केली जातेय. राज्याचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी जगनमोहन रेड्डी यांना लक्ष्य केलं. दरम्यान, या प्रकरणी जगनमोहन रेड्डी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे त्यांची भूमिका मांडली आणि चंद्राबाबू नायडू खोटं पसरवत असल्याची तक्रार केली आहे.

राजकीयदृष्ट्या प्रेरित होऊन चंद्राबाबू नायडू बेपर्वा विधान करत आहेत. यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत. तसंच, तिरुमला तिरुपती देवस्थान बोर्डाचे पावित्र्यही कलंकित केले जात आहे, असं



जगनमोहन रेड्डी म्हणाले. भगवान व्यंकटेश्वराचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात कोट्यवधी हिंदू भक्त आहेत. ही नाजूक परिस्थिती काळजीपूर्वक हाताळली नाही, तर या (पान २ वर...)

# एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना धनगर समाज बांधवांच्या वतीने निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : सकल धनगर समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रविवारी प्रत्येक विधानसभेचे आमदार यांच्या घराला घेराव घालून त्यांचे धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांची भुमिका काय आहे यासाठी सकल धनगर समाज बांधव यांच्या वतीने अक्कलकोटचे तालुक्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या कार्यालयाला घेराव घालून धनगरी ढोल वाजवून घोषणा देण्यात आल्या.

यावेळी धनगर समाज (पान २ वर...)




# आपलं नमस्ते देखील ग्लोबल झालं : पंतप्रधान मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नमस्ते अमेरिका. आता आपला नमस्ते देखील ग्लोबल झाला आहे. प्रत्येक भारतीयांमुळे हे शक्य झालं. खरं तर विदेशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांना मी राष्ट्रदूत मानतो. अमेरिकेतील भारतीयांनी खूप मोठी मजल मारली आहे. भारतीयांमुळे अमेरिकेत आपल्या देशाची प्रतिमा अधिक चांगली बनली आहे. मी प्रत्येकवेळी अमेरिकेत आल्यानंतर तुम्ही सर्वजण पाठिमागचं रेकॉर्ड मोडतात. तुम्ही सर्वजण माझ्यासाठी ब्रँड म्बेसेडर आहात. त्यामुळे मी तुम्हाला सर्वांना राष्ट्रदूत मानतो. तुम्ही सर्वांनी भारत अमेरिकेला आणि अमेरिका भारताला जोडून ठेवण्याचं काम केलं आहे, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

कोट्यवधी भारतीयांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी आपलं जीवन समर्पित केलं. पहिल्या दिवसांपासून माझं मन आणि ध्येय स्पष्ट होतं की, मी स्वराज्यासाठी माझं जीवन देऊ शकलो नाही. मात्र, मी समृद्ध भारतासाठी माझं जीवन समर्पित करीन असे ठरवले आहे, असंही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, जगाच्या बरोबर जोडण्यासाठी आपली भारतीयता ही सर्वात मोठी ताकद आहे. अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांचं योगदान जगाने पाहिलं. जगासाठी 'एआय'चा अर्थ आर्टिफिशियल इंटेलिजन्स आहे. मात्र, मी असं मानतो की, 'एआय' म्हणजे अमेरिका आणि इंडिया. अमेरिका भारत एक आत्मा आहे. हा एआय आत्मा भारत आणि अमेरिका संबंधांना नवीन उंची देत आहे. हेच एआय भारत आणि अमेरिकेला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी महत्वाचा ठरेल, असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

**भंतेजींकडून आनंद व्यक्त**

### बौद्ध भिक्षू व भंतेजींसाठी वर्षावर पार पडला चिवरदान, धम्मदान व भोजनदान सोहळा

# जगाला युद्ध नको बुद्ध हवाय : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जगात आज अनेक ठिकाणी संघर्ष आणि युद्धाची परिस्थिती असताना जगाला युद्ध नको बुद्ध हवाय, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षावर आज रविवारी वर्षावास या पवित्र महिन्यानिमित्त भंतेजींसाठी चिवरदान, धम्मदान व भोजनदान सोहळा पार पडला. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, भिक्षू महासंघांच्या राज्यभरातून आलेल्या भंतेजींच्या उपस्थितीने आज वर्षावर प्रेमाचा आणि आशिर्वादाचा वर्षाव झाला आहे. गेली दोन वर्ष मुख्यमंत्री नव्हे तर कॉमन मॅन म्हणूनच जनसेवा करत आलोय, असे मुख्यमंत्री म्हणाले. अनेक ठिकाणी संघर्षाची परिस्थिती असली तरी जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज आहे. हे



आपण आचरणात आणले तर समाज, राज्य आणि देश सुखी झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आज ज्ञान जरी खूप असले तरी बुद्धाचे तत्वज्ञान देखील तितकेच आवश्यक आहे, असे ते म्हणाले. दौलत मिली किसको तो धनवान बन गया, ताकद मिली किसको तो पहलवान बन गया, बाबासाहेब मिले मुझको तो इन्सान बन गया, अशी रचना सादर करत त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती आदर व्यक्त केला. राज्याचा कारभार तथागत गौतम बुद्ध यांची शिकवण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

या सोहळ्याची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाने आणि सामूहिक प्रार्थनेने झाली. यावेळी उपस्थितीत आदरणीय भंतेजींना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते चीवरदान, वस्त्रदान करण्यात आले. भंतेजींनी मुख्यमंत्री आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना धम्म आशिर्वाद दिले. यानंतर भंतेजींसाठी भोजनदानाचा सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, प्रवक्ते राहुल लोंढे, डॉ. राजु वाघमारे, अनिल गायकवाड उपस्थित होते.

वर्षावर प्रथमच अशा प्रकारचा सोहळा आयोजित केल्याबद्दल भंतेजींनी आनंद व्यक्त केला.

**ऑल इंडिया भिक्षू महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष भदंत डॉ. उपगुप्ता महाथेरो म्हणाले की तथागत भगवान गौतम बुध्दाच्या काळात प्रसेनजित नावाचा राजा होता तोसुद्धा अशाच प्रकारे भोजनदान, धम्मदान करत होता. त्याची आज आठवण आम्हाला आली, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा मुख्यमंत्र्याच्या शासकीय निवासस्थानी असा हा भोजनदानाचा कार्यक्रम झाला याची इतिहासात नोंद होईल, असे गौरवोद्गार महाथेरो यांनी काढले.**

# केजरीवालांचे संघाला पाच प्रश्न; जंतरमंतरवर आम आदमी पक्षाची 'जनता की अदालत'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर घेतलेल्या पहिल्याच जाहीर सभेत अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. जंतरमंतरवर रविवारी झालेल्या 'जनता की अदालत' नावाच्या या सभेत त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना मोदींच्या कृतीबाबत पाच प्रश्न विचारले. यामुळे आगामी काळात आम आदमी पक्षाने भाजपची कोंडी करण्यासाठी नवी रणनीती आखल्याचे स्पष्ट झाले आहे.

'मुलगा आता एवढा मोठा झाला का, की तो आईला तोरा दाखवत आहे,' अशी सुरुवात करून केजरीवाल यांनी आपल्या भाषणाचा रोख स्पष्ट केला. त्यानंतर



कथित पक्ष फोडाफोडी, लोकसभा निवडणुकीपूर्वी नड्डा यांनी केलेले विधान आदी विषयांवर केजरीवाल यांनी थेट सरसंघचालकांना प्रश्न केले. ''वयाच्या पंचाहत्तरीनंतर नेत्यांनी निवृत्त व्हावे, असा नियम संघ आणि भाजपने केला आहे. याच नियमांतर्गत लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, कलराज मिश्र आदींना निवृत्त केले गेले. आता अमित शहा म्हणतात, की हा नियम मोदी यांना लागू होत नाही. हे डॉ. भागवत यांना मान्य आहे का,'' असा खोचक प्रश्न केजरीवाल यांनी केला.

## संपादकीय....

# नुकसानीची भीती

राज्यात खरिपातील पिकांची काढणी वेगाने सुरू आहे. ऐन सुगीचे दिवस सुरू आहेत. प्रामुख्याने कडधान्ये, सोयाबीन काढणी हंगाम सुरू आहे. आठवडाभर वादळी वाऱ्यासह दमदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भ, मराठवाड्यात कापूस वेचणीला आला आहे. अनेक ठिकाणी वेचणी सुरू झाली आहे. हा कापूस भिजल्यामुळे दर्जा खालविणार आहे. सोयाबीनचे क्षेत्र ५० लाख हेक्टरहून जास्त आहे. हा सर्व सोयाबीन आता काढणीला आला आहे. मजुरांचा आणि मळणी यंत्रांचा तुटवडा आदी कारणांमुळे पाऊस पडण्याअगोदर शेतीमालाची काढणी करून सुरक्षित साठवणूक करणे शक्य नाही. त्यामुळे खरीप हंगामातील काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा जोर राहणार आहे. राज्यभरात खरीप हंगामातील पिकांची काढणी सुरू आहे. ऐन सुगीत पाऊस पडणार असल्यामुळे हा पाऊस मोठा नुकसानकारक ठरणार आहे. खरिपातील शेतीमाल मातीमोल होण्याची भीती आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण म्यानमार आणि बंगालच्या खाडीत वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता वाढून, त्याची वाटचाल महाराष्ट्राच्या दिशेने होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सोमवारपासून शनिवारपर्यंत राज्यात सर्वदूर दमदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा जोर राहणार आहे. वादळी वारे, मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज असल्यामुळे नुकसानीची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे. सोमवारी राज्यभराला पावसासाठी पिवळा इशारा देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रायगड, पुणे, सोलापूर, बीड, नगर, नांदेड, हिंगोली, परभणी, चंद्रपूर आणि गडचिरोलीत मुसळधार पावसाचा अंदाज आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

# शिक्षण क्रांतीचे जनक डॉ.कर्मवीर भा.पाटील



महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम म.फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८४८ साली पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्यानंतरही त्यांनी अनेक गोर-गरीब,दिन-दलित, बहुजनांसाठी शाळा सुरु केल्या.तसेच ग्रामीण भागात खेडपाडी,बहुजन, गरीब,कामकरी-कष्टकरी शेतक-यांच्या मुलाबाळांसाठी शिक्षण म्हणजे जनजागृती ! आणि जनजागृती म्हणजे समाजक्रांती ! या समाजक्रांतीमधूनच नवसमाज निर्मिती शिक्षणाच्या माध्यमातून घडवून आणण्याचे काम याच महाराष्ट्राच्या मातीवर केले ते म्हणजे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी !

त्यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील 'कुंभोज' या गावी झाला. त्यागी, दानशूर व न्यायप्रिय पिता आणि सद्गुणी माता गंगाबाई यांचे 'विचार' आणि 'संस्कार' घेवून कर्मवीर भाऊराव पाटलांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण झालेली होती. श्रम, स्वावलंबन व समता या तीन तत्वांच्या विचारांचे शिक्षण घेवून स्वत: कमी शिकले परंतू ,सर्व जाती-धर्माच्या मुला-मुलींना शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. खेडोपाडी अनवाणी पायांनी पायपीट करून मुले शाळेसाठी गोळा केली आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराजांपासून प्रेरणा घेवून, काले ता.कराड जि.सातारा या ठिकाणी ४ ऑक्टंबर १९१९ ला विजयादशमीच्या मुहर्तावर रयत शिक्षण संस्थेची पहिली शाळा सुरु करून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

आज त्यांच्यामुळे महाराष्ट्रातल्या १४ जिल्ह्यामध्ये रयत शिक्षण संस्थेची ४१ महाविद्यालये, ४३९ हायस्कूल,कॉलेजच्या मुलांसाठी २७ वस्तिगृहे,१६० उच्च माध्यमिक विद्यालये, १७ कृषी महाविद्यालये,५ तंत्र विद्यालये,५ इंग्रजी माध्यमाच्या शाळा,८ डी. एड. महाविद्यालये,४५ प्राथ.व पूर्व प्राथ.शाळा,शाळेतील मुलांसाठी ६८ वसतिगृहे,८ आश्रम शाळा,५८ आय.टी.आय. व इतर एकूण संस्थेच्या सर्व ६७९ शाखा आहेत.एकूण विदयार्थी सुमारे ४,५८,०४४ आणि एकूण सेवक १३,५५३ आहेत.

आज या छोट्याशा कार्याचे रोपटे एवढे प्रचंड प्रमाणात विस्तारले की, वटवृक्ष हे बोधचिन्ह संस्थेच्या नावाला सर्वार्थाने सार्थ झाले. त्या काळात रुढी, परंपरा,अंधश्रध्दा आणि अज्ञानाने संपूर्ण समाज पोखरला गेला होता. त्या आज्ञानातून भरडल्या गेलेल्या माणसाला बाहेर काढण्याचे काम या व्यवस्थेत कोणी केले असेल तर ते फक्त कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ! म्हणताना,म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करताना जनमाणसांकडून कर्मवीर ही उपाधी मिळाली.तसेच पुणे विदयापीठाने त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना डी.लिट. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली आणि भारत सरकारने पद्मभूषण हा किताब देवून गौरविले.



खेडयांतील बहुजन समाज त्यांनी जवळून पाहिला होता,त्यांच्या मनातील अंधश्रद्धेची अज्ञानाची जळमटे काढून टाकायची असतील तर,शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे भाऊरावांना कायम वाटत होते,आणि म्हणून त्यांनी आपले सारे आयुष्य समाजासाठी खर्च करण्याचा निश्चय केला.

मुळात रयत शिक्षण संस्था स्थापन करण्यामागे त्यांचा एवढाच हेतू होता की, मागासलेल्या,गरीब,होतकरू मुलांना मोफत शिक्षण मिळावे.न्याय,समता,बंधुता, श्रमप्रतिष्टा,स्वावलंबन, सामाजिक बांधिलकी इत्यादी मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवून समाज साक्षर सुजाण बनविणे. खरंतर यापाठीमागे त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा फार मोठा त्याग होता. कारण ब-याचदा वसतिगृहातील मुलांना जेवणासाठी काहीही धान्य,पैसे शिल्लक नसताना स्वत:चे दागिणे आणि मंगळसुत्र विकून त्यांनी वसतिगृहे व रयत शिक्षण संस्था चालविली.शिक्षणाची ज्ञानगंगा जनसामान्यांच्या घरापासून गोरगरीबांच्या हृदयापर्यंत नेण्याचे अतुलनीय असे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या रयत शिक्षण संस्थेमार्फत केले. आज रयत शिक्षण संस्थेला आशिया खंडातील एक नामवंत शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाते.अशा या संस्थेचा वटवृक्ष विस्तारीत करून,अहोरात्र समाजासाठी झटणाऱ्या कर्मवीरांनी ९ मे १९५९ रोजी या जगाचा निरोप घेतला, अशा महान ज्ञानगंगेच्या आधुनिक भगिरथास त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम..!त्यांच्या विचार-कार्याला अभिवादन..!

शब्दांकन-------

**शिवश्री.सतिष उखर्डे टेंभूर्णीकर**

प्रसिद्ध व्याख्याते तथा लेखक

मोबा.-९४२२९९२३१०

# अत्यंत बहाद्दुरीने,जिद्दीने किर्ती भराडियाने रचला इतिहास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

२० सप्टेंबरच्या पहाटे १.४५ वाजता श्रीलंकेतील तलाईमनार येथे समुद्रात घेतली झेप...

खारे पाणी,लहान मोठे जलचर जीव,उलट्या,लाटांचा उलटा प्रवाह,मोठ मोठ्या लाटा यांचा सामना करत २० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजून १० मिनिटाला पोहोचली भारतातील धनुष्यकोडी येथे...

वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटीचे अधिकारी होते उपस्थित आणि त्यांनी किर्तीला Longest Non Stop Transnational Swim By Child सर्टिफिकेट देऊन केला सन्मान....

किर्ती नंदकिशोर भराडिया,सोलापूर (वय १८) हिने श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमिटर चे अंतर समुद्रात न थांबता १० तास २५ मिनिट पोहून पूर्ण केले.या ऐतिहासिक क्षणाला वर्ल्ड रेकॉर्ड कम्यूनिटीचे उच्च अधिकारी उपस्थित होते. त्यांनी कीर्तीला विश्र्व विक्रमाचे प्रोविजनल प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले

**कसा साधला विक्रम...**

किर्ती दि.१५ सप्टेंबर रोजी आपल्या आई वडिलां समवेत रामेश्वर ला रवाना झाली आणि १७ तारखेला रामेश्वर येथे पोहोचली.रामेश्वर येथे माहेश्र्वरी

**१० तास २५ मिनिट न थांबता समुद्रात पोहून पार केले भारत श्रीलंका अंतर(ग्रुप)**

भक्त निवास यांनी किर्ती तथा कीर्तीच्या परिवाराची पूर्ण व्यवस्था केली होती. दि.१७ व १८ रोजी किर्ती ने आई वडीलांसह देव दर्शन घेऊन पूर्ण विश्रांती घेतली. दि.१९ रोजी कीर्तीचे फिटनेस तपसण्यात आले.आणि त्या दिवशी दुपारी १ वाजता रामेश्वर येथून किर्ती बोटिने श्रीलंके साठी रवाना झाली. किर्ती सोबत तिच्या प्रशिक्षिका रुपाली रेपाळे,अनिरुद्ध महाडिक,वडील नंदकिशोर,काका द्वारकादास,भाऊ अविनाश व रेस्क्यू टीमचे १५ जण असे एकूण २० जण व इंडीयन नेव्ही चे जवान होते.श्रीलंका हद्दीत तेथील नेव्ही ने कीर्तीचे स्वागत केले व पूर्ण सहकार्य केले. सर्वजण सायं ६ वाजता श्रीलंकेतील तलाईमनार येथील समुद्रकिनारी पोहाचले. सर्वांनी भोजन करून विश्रांती घेतली व वातावरणाचा अंदाज घेऊन २० सप्टेंबरच्या पहाटे १.४५ वाजता कीर्तीने समुद्रात झेप घेतली.किर्ती सोबत तिचे रक्षण करण्यासाठी ३ बोटी तत्पर होत्या.त्या बोटींना अंधारात मार्ग दाखविण्यासाठी हॅलोजन व दिशा दर्शक यंत्र लावलेले होते.रात्रीच्या काळोख्या अंधारात किर्ती कशाची सुद्धा तमा न बाळगता फक्त हात पाय मारत होती.या काळोख्या अंधारात कीर्तीला तिच्या सोबतच्या बोटीच दिसत होत्या. बोटीत बसलेले सर्वजण डोळ्यात तेल घालून समुद्रात चहूबाजूला पूर्ण लक्ष्य देऊन होते.दर १ तासाला किर्ती पोहता पोहता पाणी,चॉकलेट,खजूर, केळी यांचा सेवन करत होती. पोहताना लहान लहान माश्यांचा त्रास सुद्धा होत होता पण त्याची सवय कीर्तीला होती म्हणून काही वाटले नाही.या दरम्यान खाऱ्या पाण्यामुळे व माश्यांच्या वासामुळे किर्तिला ३ वेळा उलट्या सुद्धा झाल्या....पण कीर्तीने जिद्द नाही सोडली.ती सतत पोहतच राहिली.अरबी समुद्र व बंगालचा उपसागर असे २ समुद्र एकत्रित असल्याने कीर्तीला लाटांच्या उलट प्रवाहांचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागला. जिथे १ तासात ४ किलोमिटर अंतर पार व्हायचे त्या ठिकाणी तासात एकच किलोमिटर अंतर पार होऊ लागले.७ तासानंतर कीर्तीचे खांदे,हाथ व पाय खूप जोराने दुखण्यास सुरु झाले. त्याकडे कीर्तीने पूर्ण दुर्लक्ष केले व ती पोहतच राहिली. आणि शेवटी ९ तासानंतर किर्ती मात्र पूर्ण पणे थकली....तिचे हाथ,पाय,खांदे,पाठ,कंबर इतके दुखू लागले की किर्ती पोहता पोहता समुद्रावर उलटी झोपून पोहू लागली...तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.समुद्रात पाणी कमी पण कीर्तीच्या डोळ्यात पाणी जास्त होते. कीर्तीची ही अवस्था खूप काही सांगत होती.ती रडत होती पण खेळ सोडण्यास तयार नव्हती.विक्रम पूर्ण होण्यासाठी शेवटचा लगभग एकच किलोमिटर शिल्लक होता.पण हे पार करणे खूपच अवघड वाटू लागले. बोटीतील सर्वांच्या डोळ्यात अश्रू वाहत होते....किर्ती पण रडत होती पण खेळ सोडण्यास तयार नव्हती. स्व.बालकिसनजी भराडिया हे तिचे आजोबा.... त्यांची इच्छा होती की किर्ती ने हा विक्रम करावा आणि किर्ती ने आजोबांचे ध्यांन करून असह्य अश्या वेदना सहन करून हाथ पाय मारत दुपारी १२ वाजून १० मिनिटाला धनुश्यकोडीला पोहाचली आणि हा विक्रम स्वतच्या नावावर करून घेतली किर्ती ने विक्रम करून समुद्राबाहेर आल्यावर वडिलांनी रडत रडत कीर्तीला जोरात आलिंगन दिले व सर्व परिवाराने जल्लोष व्यक्त केला.

## चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताने जिंकलं पहिलं ऐतिहासिक सुवर्णपदक

(पान १ वरून..) कांस्यपदक जिंकले. तर त्यांनी २०१४ मध्येही कांस्यपदकही जिंकले होते. बुडापेस्ट येथे सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये डी गुकेशने अमेरिकेच्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या फॅबियानो कारुआनाचा पराभव करून भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक जवळपास निश्चित केले होते. भारताने १०व्या फेरीच्या सामन्यात अमेरिकेचा २.५-१.५ असा पराभव केला होता.

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये प्रत्येक फेरीत दोन संघ एकमेकांविरूद्ध भिडतात. जर एका संघाने फेरी जिंकली तर त्याला दोन गुण मिळतील, आणि जर तो सामना अनिर्णित राहिला तर त्याला एक गुण मिळेल. या कारणास्तव भारताचे १० फेऱ्यांनंतर एकूण १९ गुण आहेत. सलग ८ फेऱ्या जिंकून भारताचे एकूण १६ गुण झाले. पण ९व्या फेरीत भारताला उझबेकिस्तानसोबत ड्रॉ खेळावा लागला, त्यामुळे भारताच्या खात्यात आणखी एक गुण जमा झाला आणि एकूण १७ गुण झाले. अमेरिकेला पराभूत केल्यानंतर संघाने १९ गुणांसह पहिले स्थान मिळविले.

## ...तर दूरगामी परिणाम होतील

(पान १ वरून..) खोट्या गोष्टींमुळे व्यापक वेदना निर्माण होऊ शकतात. विविध आघाड्यांवर दूरगामी परिणाम होऊ शकतात, अशी भीतीही जगनमोहन रेड्डी यांनी व्यक्त केली.

सत्य समोर आणून भक्तांचा विश्वास पुन्हा मिळवण्याचं आवाहनही त्यांनी केलं. हे राजकीय हेतूने पसरवलेले खोटे आहे. या खोट्या प्रचारामुळे जगभरातील हिंदू भाविकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात, असंही ते म्हणाले. टीटीडी एक स्वतंत्र मंडळ आहे. यामध्ये विविध पार्श्वभूमीतील प्रतिष्ठित भक्त, केंद्रीय मंत्री, इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी शिफारस केलेल्या इतरांचा समावेश आहे. तसंच, भाजपाशी संलग्न असलेले सदस्यही या बोर्डावर आहेत. टीटीडीच्या प्रशासनावर देखरेख ठेवण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाकडे आहे आणि आंध्र प्रदेश राज्य सरकारची यात फारशी भूमिका नाही, अशी माहितीही त्यांनी दिली. जगनमोहन रेड्डी यांनी असेही सांगितले की, मंदिरात येणाऱ्या तुपाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी व्यापक तपासणी केली जात आहे. कठोर ई-निविदा प्रक्रिया, छइङ-मान्यताप्राप्त प्रयोगशाळा चाचण्या आणि कोणत्याही सामग्रीचा वापर करण्यापूर्वी बहुस्तरीय तपासण्या केल्या जातात, हे अधोरेखित करून तेलुगू देसम पक्षाच्या राजवटीच्या मागील कार्यकाळातही अशाच प्रकारचे उपाय केले गेले होते. ते पुढे म्हणाले की, तुपाचा दर्जा निकृष्ट असल्याचे आढळून आल्याने टँकर नाकारण्यात आल्याची अनेक उदाहरणे यापूर्वी घडली आहेत.

## एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना धनगर समाज बांधवांच्या वतीने निवेदन

(पान १ वरून..) बांधव सरकारच्या विरोधात घोषणा दिले. आमदार कल्याणशेट्टी हे कार्यालयात आले असता धनगर समाज बांधवांनी त्यांना निवेदन दिले. त्यावेळी आमदार कल्याणशेट्टी यांनी सकल धनगर समाज बांधवांच्या शिष्टमंडळाला बोलताना सांगितले की धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मी स्वतः राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांना याबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. मी सदैव धनगर समाजाच्या पाठीशी असल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

यावेळी धनगर समाजाचे नेते सुनील बंडगर, दत्तात्रय हिळ्ळी, अनिल बर्वे, सुभाष पुजारी, शंकर व्हनमाने, दत्तात्रय माडकर, सुर्यकांत बाचके, स्वामीराव घोडके, संतोष शिंदे, बिरु माने, भुताळी वागदरी, काशिनाथ निंबाळ, रेवणसिध्द शेरी, निलेश लवटे, सोमनाथ घोडके, गंगाधर म्हेत्रे, बिरप्पा मैंदर्गी, विजय धर्मसाले यांच्या सह आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रीन फाउंडेशनचे अहिल्यादेवी नगर जिल्हाध्यक्ष तुषार महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नगर/प्रतिनिधी: ग्रीन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य अहिल्यादेवी नगर जिल्हाध्यक्ष तुषार संजय महाजन यांचा जन्मदिवसानिमित्त भव्य वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले. आदर्श पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण प्रेमी तुषार महाजन यांना आंतरराष्ट्रीय युवा दिवसानिमित्त ग्रीन वर्ल्ड पुरस्कार प्राप्त, आदर्श पत्रकार म्हणून ओळख असलेला सामाजिक आणि पर्यावरण विषयक प्रत्येक कार्यात हिरिरीने आपला सहभाग नोंदविणारे तुषारजी महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त तिर्थक्षेत्र रामदरा महादेव मंदीर परिसर येथे भव्य वृक्षारोपण ग्रीन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अमितजी जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



वृक्षारोपण ही काळाची गरज आहे समाजाने हे लक्षात घेणे गरजेचे असून प्रत्येक कुटुंबातील सदस्याने वृक्षाची लागवड ही आपल्या लेकरा प्रमाणे करावी. वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यापुढेही असेच समाजोपयोगी कार्यक्रम हाती घेण्यात येतील, असे ग्रीन फाउंडेशन उपाध्यक्ष तुषार महाजन यांनी म्हटले.

यावेळी ग्रीन फाउंडेशन हवेली तालुका संपर्क प्रमुख विनोदबाबा यादव, हवेली तालुकाध्यक्ष गणेश काळभोर, दादा कोळपे, सचिन महानवर, भाऊसाहेब कोळपे, बाबासाहेब घोडके, गणेश पातडे उपस्थित होते. अमित जगताप यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यावेळी उपस्थितांना त्यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले ''समृद्ध व आनंदी जीवनासाठी पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ होत पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्यासाठी वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

तसेच विनोद यादव म्हणाले की, समस्त सृष्टीकरिता व मानवी जीवनाकरिता वृक्ष हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. परमेश्वराने या सुंदर सृष्टीचे निर्माण केले आणि आपल्याला निसर्ग रुपी अनमोल ठेवा बहाल केला पण हल्ली आपल्या देशात विकासाच्या नावावर व स्वतःच्या स्वार्थासाठी लाखो वृक्षांची कत्तल केली जात आहे. त्यामुळे देशातीलच नाही तर संपूर्ण पृथ्वीवरील निसर्गाचा समतोल बिघडलेला आहे याची अनुभूती आपण सर्वजण घेत आहोत 'ग्लोबल वार्मिंग' हा त्यातील एक भाग आहे. ही फार मोठी समस्या आज संपूर्ण विश्वासाठी धोकादायक अशी आहे. निसर्ग मानवाला सदैव निस्वार्थ भावनेने भरभरून प्रेम, स्नेह देत असतो त्या बदल्यात आपलेही हे कर्तव्य आहे की आपण निसर्गावर तेवढेच किंवा किंबहुना त्यापेक्षा जास्त प्रेम करावे व परमेश्वराचे आभार मानावे. विकास हा निश्चितच व्हायला हवा पण त्याचबरोबर वृक्षांचे व परमेश्वराने निसर्ग रुपी दिलेल्या अनमोल ठेव्याचेही रक्षण करणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ करमाळा बंद करून केला निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/प्रतिनिधी : मराठा आरक्षणासाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे अंतरवली सराटी येथे उपोषण करत आहेत तरी राज्य सरकारने दखल घ्यावी यासाठी रविवारी २२ सप्टेंबर रोजी करमाळा शहर कडकडीत ठेवण्यात आले होते.



बंदच्या हाकेला करमाळ्यातील सर्व बहुजन बांधवांनी साथ देत सकाळपासूनच सर्व व्यवहार बंद ठेवत स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळण्यात आला सकाळी मराठा समाज व बहुजन समाज बांधवांनी शहरातील विविध चौकातून मोटारसायकल रॅली काढून व करमाळा तहसील शिल्पा ठोकडे यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देत जरांगे पाटील यांना देत राज्य सरकारने जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे अशी मागणी करण्यात आली यावेळी करमाळा शहरातील सर्व बहुजन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## गुन्हेगारी जगत...

### निराळे वस्तीत घर फोडून रक्कमसह सोन्याचे कर्णफुले चारले

सोलापूर (प्रतिनिधी) कामाच्या शोधासाठी बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश करत किचन मधील लोखंडी कपाटातील व देवघरात असलेल्या गल्लयातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण १६ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी चंद्रकांत लक्ष्मणराव जावळे (वय-४९,रा.निराळे वस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पो-लीस नाईक भिमदे हे करीत आहे.

### स्पॅन हॉस्पिटल मधून सोन्याचे मंगळसूत्र पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) बाळाला चेकअप करिता घेऊन आलेल्या फिर्यादी सविता पांडुरंग शिरगिरे (वय-३१,रा.मु.पो.उमरगा ता.तुळजापूर) यांनी त्यांच्या वार्ड नंबर १ चा दरवाजा उघडून आत प्रवेश केला.त्यावेळी रूम मधील बाथरूम मध्ये बाळाला आंघोळ करताना त्यांच्या मुलीने काढून ठेवलेले तीस हजार रुपये किमतीचे ३.५ ग्रॅमचे सोन्याचे मनी मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. अशा आशयाची फिर्याद सविता शिरगिरे यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना २० सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान घडली.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सरतापे हे करीत आहेत.

### मडकी वस्तीतून क्रुझर पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) मडकी वस्ती येथे चार चाकी ट्रॅक्स क्रुझर वाहन क्रमांक एमएच.२४.बीएल.९२६४ हे वाहन पार्क करून ठेवलेले असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे.ही घटना १२ ते १३ सप्टेंबर दरम्यान मडकी वस्ती येथे घडली.याप्रकरणी दत्ता अण्णाप्पा घोळके (वय-३५,रा.नाथ रेसिडेन्सी,मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

# आमदार सचिन कल्याणशेट्टी मुळे बौद्ध समाजाला कोट्यवधींचा निधी : बलवान गोतसुर्वे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दक्षिण सोलापूर / प्रतिनीधी

जेंव्हा पासून आमदार सचिन कल्याणशेट्टी नोव्हेंबर २०१९ला आमदार झाले तेंव्हा पासून बौद्ध समाजाला कधी नव्हे कोट्यावधीचा निधी वेगवेगळ्या माध्यमातून मिळू लागला. असल्याची माहिती भारतीय जनता पार्टी अनु जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांनी दिली.






पुढे बोलताना बलवान गोतसुर्वे यांनी काही गावात तर एकाच गा-वात त्यांच्या या पंचवार्षिक मध्ये १ते २ कोटी व त्या पेक्ष्याही जास्त निधी मिळालेला आहे.आणि हे कोणी नाकारू शकत नाही यात वळसंग, आचेगांव, कुंभारी, मुस्ती अश्या अनेक गावात बौद्ध वस्त्यामध्ये मोठया प्रमाणात आमदार फंड, सामाजिक न्याय, समाजकल्याण, २५१५, जनसुविधा उझ्झऊ अश्या अनेक माध्यमातून निधी उप-लब्ध करून दिला आहे त्यात बुद्ध विहार, समाजमंदिर, अस्थीविहार ऐतिहासिक भूमी स्मारक व सुशोभीकरण,वस्तीअंतर्गत रस्ते, बंदिस्त गटार, पेव्हर ब्लॉक, डएऊ विद्युतीकरण, जिम साहित्य असे विविध कामे मार्गी लावले आहेत मा.देवेंद्र फडणवीस साहेब मुख्यमंत्री होण्याअगोदर व सचिन कल्याणशेट्टी आमदार होण्याअगोदर आपल्या अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत कधीच निधी मिळाला नाही पण आमदार सचिन सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी २५-३०कोटी चा निधी एका ह्या योजनेतून तालुक्यात खेचून आणला आहे. समाजकल्याणच्या माध्यमातून दर वर्षी मतदार संघात ५-६ कोटी निधी मंजूर केलेला आहे. त्याच प्रमाणे आमदार स्थानिक विकास निधी,२५१५ ग्राम विकास व जनसुविधा अश्या विविध माध्यमातून आपली कार्य तत्परता दाखवत बौद्ध समाजात करोडोचा निधी मंजूर करून कामे मार्गी लावले आहेत.

**अक्कलकोट विधानसभा मतदार संघात मागासवर्गीय वस्ती विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी**

माझ्या एकट्या आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे बौद्ध समाजासाठी आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत व्यायामशाळा इमारत ७.००लाख,मागासवर्गीय वस्ती बंदिस्त गटार ६.००लाख, ओपन जिम साहित्य ७.००लाख आमदार फंडातून २०लाख त्याच प्रमाणे विविध योजना अंतर्गत बौद्ध सभामंडप १०.००लाख,व्यायामशाळा संरक्षक भिंत ८.००लाख, बौद्ध स्मशानभूमी संरक्षक भिंत २३लाख पेव्हर ब्लॉक सिमेंट रस्ता १०.००लाख, डएऊ हायमास्ट व विद्युत्तीकरण या पूर्वी १.२५लाख व पुन्हा ३.००लाख असे ५५.००लाख,बौद्ध वस्ती अंतर्गत सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा, बंदिस्त गटार व पेव्हर ब्लॉक या करीता आता पर्यन्त साधारण ५०लाख असे दीड कोटी पर्यन्त निधी आमदार साहेबांनी मंजूर केला असून सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व कामे जवळ जवळ पूर्ण झाले आहेत.आणि येत्या १५ दिवस ते महिनाभरात मतदार संघासाठी ८-१०कोटी च्या यादीत आचेगांव ला नेहमी प्रमाणे मोठया प्रमाणात निधी मिळणार आ-हेत. हेवढया मोठया प्रमाणात बौद्ध समाजासाठी निधी आजपर्यन्त च्या इतिहासात कधीच मिळाला नाही. व तरतूद ही करण्यात आली नाही, निधी द्यायचं जाऊद्या उलट बौद्ध समाजाची मते घेऊन समाजाबद्दल अकस ठेऊन अर्वाच्छ शब्द वापरले बोलले गेले आहे हे संबंध जनतेला माहित आहे. असो. लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी बौद्ध समाजाचा प्रधान्याने विचार करून मूलभूत गरजा सोबत विहार, सभामंडप, वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा, संरक्षक भिंत, समाजमंदिर या साठी ना भूतो ना भविष्यतो इतका करोडोंचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभार व्यक्त करतो आणि विनंती करतो कि आपण इतके भरमसाठ निधी दिलात तरी अद्याप बौद्ध समाजाचा बॅकलॉग या पूर्वीच्या लोकप्रतिनिधीच्या नाकर्तेपणा मुळे भरला गेलेला नाही,तरी अजून मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असून आपण ते या पंचवार्षिक प्रमाणे पुढील काळात देखील निधी उपलब्ध करावे आणि बौद्ध समाज ही मोठया प्रमाणात व्यक्तिशः आपल्या सोबत राहील यात काही शंका नसल्याचे शेवटी बलवान गोतसुर्वे यांनी सांगितले.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री संत ज्ञा-नेश्वर महाराज पालखी महामार्गाच्या सहाव्या टप्प्याच्या चौपदरीकरण कामाचा भूमीपूजन समारंभ नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री भारत सरकार यांच्या हस्ते कर्वे नगर, पुणे येथे संपन्न झाला.




या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर च्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते वारकरी पगडी, विना, चिपळ्या, श्रींची मूर्ती व शेला देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

पंढरीची वारी हा वारकरी संप्रदायाबरोबरच अवघ्या महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक व सामाजिक जी-वनाचे अधिष्ठान असलेला विषय आहे. पंढरीच्या वारीला शेकडो वर्षांची अध्यात्मिक परंपरा आहे. ज्या मार्गाने शेकडो वर्षांपूर्वी संतांची पाऊले चालली व आताच्या काळात प्रतिवर्षी लाखो भाविक-भक्त-वारकरी चालतात त्या मार्गाचे सुशोभीकरण व सोयी- सुविधांमुळे सुखकर झालेली वारी ही आपले अथक प्रयत्न, नियोजन व मार्गदर्शनाने संतांच्या पालखीमार्गाच्या विस्तृतीकरणाने वैष्णवांच्या या मांदियाळीची मोठी सेवा आपण शासनाला घडविलीत, याबद्दल गडकरीं यांचे कृतज्ञता पत्र देऊन सहस्रशः अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. त्यांचा देखील मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि आळंदी व देहू संस्थानांच्या प्रमुख विश्वस्तांचा देखील नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



# सुंदरपुर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सोमवंशी यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदरपुर येथील शालेय व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षपदी अनिल बाबासाहेब सोमवंशी यांची निवड करण्यात आली.. नुकतेच शालेय व्यवस्थापन समिती सुंदरपूर चे पुनर्गठण करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्ष अशोक पवार, उपाध्यक्ष अकबर पटेल, शिक्षण तज्ञ राजेंद्र सोमवंशी व सदस्य तसेच पालक वर्ग यांचे प्रमुख उपस्थितीत शालेय व्यवस्थापन समितीचे नूतन अध्यक्ष म्हणून अनिल आबासाहेब सोमवंशी यांची तर उपाध्यक्ष म्हणून भाऊराव म्हसू गवळी यांची एकमताने निवड करण्यात आली असून सदस्य पदी कविता संदीप सोमवंशी, जयश्री युवराज सोमवंशी, रुक्सार अमजद खान, विश्वास गांगुर्डे,गोपाळ गांगुर्डे, अनिल भास्कर साळवे, उषा अनिल पवार, मोबीन शेख, भारती भारत सोमवंशी व जाकीर शेख यांची निवड करण्यात आली आहे ,ग्राम पंचायत सदस्य म्हणून गुलाब दगू पवार व शिक्षण तज्ञ म्हणून राजेंद्र बाळासाहेब सोमवंशी यांची निवड करण्यात आली.

नूतन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांचे सुंदरपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,व ग्रामस्थ यांचे वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# आ.धिरजभैय्या देशमुख यांची औसा येथे उपोषणस्थळी भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा /प्रतिनिधी : सोयाबीनला ८५०० रु हमीभाव जाहिर करण्यात यावा,शेतकर्याची सर-सरट कर्जमाफी करावी या मागणी साठी मागील ४ दिवसा पासुन औसा तहसिल कार्यालय समोर छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे हे आमरण उप-ोषणा बसले आहेत, या उपोषकर्त्या ना आज ला-तुर ग्रामिण चे आमदार धिरजभैय्या देशमुख यांनी भेट दिली,सदरील मागण्या बाबत शासना दरबारी पाठपुरवठा करु असे बोलुन,वेळ पडल्या शेतकर्या साठी रसत्या वर ही उतरु असेही बोलले, या वेळी त्यांचा सोबत विजयभैय्या देशमुख २० शुगर चे व्हाईस चेरमन, शाम भोसले मारुती महारज कारखान्या चे चेरमन, महेंद्र भादेकर संचालक मांजरा स कारखाना, सचिन दाताळ,जयराज कसबे,संपत गायकवाड व ई कार्यकर्ते उपस्थित होते .

# युवकांनी देश सेवेचे वृत हाती घ्यावे : संजय निमसे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी /संजय महाजन

भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग उत्तर महाराष्ट्र तसेच चिचोंडी पाटील ग्रामपंचायत चिचोंडी पाटील , बबनराव शेळके मित्र मंडळ नगर तालूक्याच्या वतीने.नगर तालुक्यातील हतुळन देवीचे येथील संजय रावसाहेब निमसे पाटील मेजर हे मुंबई येथील वरळी या ठिकाणी पो-लीस दलामध्ये भरती झाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक मंगल निमसे पाटील यांच्यासहित सत्कार आयोजित करण्यात आला.



यावेळी चिचोंडी पाटील येथील पोपट कोकाटे यांचा त्यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. मेजर सुरेश निमसे पाटील यांनीं मिलिटरी मध्ये सर्विस केल्यानंतर रिटायर झाले. त्यानंतर तीन वर्ष त्यांनी शेतीचे डेव्हलप केले. आणि चौथ्या वर्षी पुन्हा पोलीस दलामध्ये भरती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला. याप्रसंगी निमसे पाटील म्हणाले की युवकांनी व्यसनाधीन होण्यापासून प्रवृत्त व्हावे. आणि देश से-वेचं वृत हाती घेऊन विविध सामाजिक क्षेत्रात काम करावे.चांगल्या पधदतीचा व्यवसाय करावा किंवा पोलीस आणि मिलिटरी मध्ये भरती होण्यासाठी चांगल्या पद्धतीचा व्यायाम करावा, रनिंग करावे, अभ्यास करावा.देश सवा करावी.

देश सेवेबरोबरच आपल्या आई-वडिलांची ही सेवा त्यांनी करावी असा या सत्कार समयी ते म्हणाले संजय निमसे पाटील आणि मंगल निमसे पाटील यांचा सत्कार ह. भ. प. स्वप्नील महाराज पवार, चिचोंडी चे सरपंच युवा सरपंच शरद भाऊ पवार, आणि भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभागाचे बबनराव शेळके , सोसायटीचे चेअरमन महादेव खडके यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळी माजी चेअरमन राजेंद्र कोकाटे , मा. प्राचार्य एच जी कोकाटे सर, जिल्हा परिषदेचे मा. प्राचार्य बाबासाहेब पवार सर , रीटायर पी.एस.आय रफीक़ सय्यद , रीटायर शिक्षक गंगाधर देवकर सर, आबासाहेब वाडेकर, संभाजी खडके, ग्रा.पं. सदस्य ज्ञानेश्वर ठोंबरे, मा. ग्रा.प. सदस्य संतोष कोकाटे, लोकमान्य पतसंस्था संचालक अरुण दवणे, लोकमान्य पतसंस्था संचालक दत्तात्रय कोकाटे ,दत्तात्रेय शेळके, संतोष वाडेकर, सोसायटीचे माजी सचिव राम ठोंबरे, चंदू पावणे, कल्याण जगताप पाटील , धोंडीराम आगलावे, सामाजिक कार्यकर्ते शहाजी गोरे, शिवाजी कोकाटे, सोसायटी सदस्य बबन कोकाटे , रावसाहेब कोकाटे ,राजेंद्र तनपुरे , अंबादास कोकाटे भोजाभाऊ गव्हाणे, राजू कोकाटे, मेटेज्ञपाटील, बाबुराव शेळके , हरून मनियार बन्सी आगलावे, आदि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना सरपंच शरद भाऊ पवार यांनी केली तर आभार बबनराव शेळके यांनी मानले.

**सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक समन्वय समितीचा निर्धार**

**विविध मागण्यांचे दिले निवेदन**

# नियमबाह्य बदल्या रद्द कराव्यात अन्यथा जिल्हा परिषदेवर आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/सोलापूर : अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दि.२२ जुलै २०२४ च्या आदेशाला केराची टोपली दाखवत मनमानी पद्धतीने २१ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्या गटविकासाधिकारी शंकर कवितके यांना अंधारात ठेऊन केल्या आहेत.सदर बदल्या तातडीने रद्द कराव्यात अन्यथा सोलापूर जिल्ह्यातील सर्वच शिक्षक संघटना समन्वय समितीच्या माध्यमातून सोलापूर जिल्हा परिषदेवर आंदोलनाचा इशारा समन्वय समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिला.




विभागीय आयुक्तांच्या अधिकाराचा गैरवापर करत वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करत मनमानी आणि नियमबाह्य पद्धतीने कामकाज अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचे सुरू आहे.१० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या आणि दोन शिक्षक कार्यरत असलेल्या शाळेतील सेवाज्येष्ठ शिक्षकाचे तात्पुरते समायोजन करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दि.२२ जुलै २०२४चे आदेश डावलून गटविकासाधिकारी यांना अंधारात ठेवून नियमबाह्य बदल्या केल्याचा आर-ोप संघटनेच्या वतीने यावेळी करण्यात आला.

जिल्ह्यातील इतर सर्वच तालुक्यात नियमानुसार कामकाज चालत असून त्याला अक्कलकोट तालुका मात्र अपवाद असल्याचे यावेळी नमुद करण्यात आले. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचा पदभार तातडीने काढून घेण्यात यावा. तसेच नियमबाह्य बदल्या करणाऱ्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी मागासवर्गीय संघटनेचे तालुकाध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे राज्यनेते अंकुश काळे,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष म.ज.मोरे,सोलापूर जिल्हा शिक्षक संघ शिवाजीराव गटाचे जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड,महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे राज्यनेते अनिल कादे,माजी पुणे विभागीय अध्यक्ष दयानंद कवडे,जिल्हानेते विकास उकिरडे,जिल्हानेते बाबा शेख,राजन ढवण,उम्मीद सय्यद यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# कृषि तंत्र विद्यालय खानिवली येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी /प्रतिनिधी :

कृषी मधील विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे, कृषिपुरक व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी व कौशल्ययुक्त कृषि उद्य-ोजक तयार करण्याच्या उद्देशातून कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्ह-ावा, या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने भिवंडी तालुक्यातील कृषि तंत्र विद्यालय खानिवली येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ची स्थापना करण्यात आली आहे.




या केंद्रांचे उद्घाटन २० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन केले असून आले. हे दूरदृश्य विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. त्याच अनुषंगाने कृषि तंत्र विद्यालय खानिवली येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन खानिवली ग्रामपंचायतिच्या सरपंच निकिता दळवी, पारसिक लोकमित्र मंडलाच्या सचिव अंजली पाटील, निसर्गमित्र नंदकुमार धुमाळ, कृषि तंत्र विद्यालय खानिवली विद्यालयाचे प्राचार्य मिलिंद घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रांमधून मोफत कौशल्य विकास कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येणार असून कृषि तंत्र विद्यालय खानिवली विद्यालयात मोती उत्पादन प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

सदर कोर्स राबवण्यासाठी रूची सामाजिक संस्थेचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे, कृषिपुरक व्यवसाय महत्त्वाचा किती महत्त्वाचा आहे. हे प्रास्ताविकेत प्राचार्य मिलिंद घरत यांनी मांडले. तर प्रकल्प समन्वयक मिलिंद जाधव यांनी मोती उत्पादन प्रशिक्षणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी खानिवली ग्रामपंचायतिच्या ग्रामसेविका जागृती ठाकरे, प्रा. प्रविण पितांबरे, विद्यार्थी, पालक , शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उप प्राचार्य जितेंद्र खरे यांनी केले.

## थोडक्यात



### इंदापूर शहरातील भटक्या कुत्र्यांना पासून नागरिकाना व लहान मुलांना धोका

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे

इंदापूर शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली असून चौका-चौकात ही कुत्री टोळ्या करून उभी असतात. लहान मुले, विध्यार्थी, विध्यार्थीनी, महीला यांच्या मध्ये या कुत्र्यांची प्रचंड दहशत आहे.शाळकरी मुले जीव मुठीत घेऊन शाळेत जातात. पालकांमध्ये या मुळे चिंतेच वातावरण आहे. दुचाकी वाहनांचा ही कुत्री पाठलाग करतात. अनेक वेळा अचानक समोर आडवे येतात.या मुळे अनेक वेळा अपघात होवून दुचाकीवरून प्रवास करणारे गंभीर जखमी झाले आहेत. पहाटे फिरायला जाणाऱ्या मध्ये तर या भटक्या कुत्र्यांबरोबरच तथाकथित पाळीव कुत्र्यांची वेगळीच भीती असते.त्याना अक्षरशः हातात काठी घेऊन बाहेर पडावे लागते. भविष्यात होणाऱ्या संभाव्य दुर्दैवी घटना टाळण्यासाठी या सर्व बाबींकडे संबंधित प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देत सर्व भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे व उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### लोको पायलटला अटकाव करून आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर : मोदी कॉलनीतील रेल्वे लाईन जवळील डीएमई ऑफिसच्या गेटवर उभे राहून लोको पायलटला इच्छापूर्वक अटकाव करत भारतीय रेल्वेच्या १३ गाड्यांच्या वाहतुकीस खोळंबा करून एकूण रेल्वेचे ४५ लाख ४७० रुपयाचे आर्थिक नुकसान करून लोको पायलटला धमकावून कर्तव्यास न जाण्यास प्रवृत्त केल्याची फिर्याद रवींद्र प्रभुदास राय (वय-४८,व्यवसाय नोकरी रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नंबर एक,कर्मीदल चालक,एवं परिचाल लॉबी,सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एस.जे निगडे (रा.सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १८ ते १९ सप्टेंबर दरम्यान घडली. पुढील तपास पोसई.पाटील हे करीत आहेत.

# मराठा तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कटिबद्ध : नरेंद्र पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/सोलापूर : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात एक लाख मराठा उद्योजक बनवण्याचे संकल्प पूर्ती झालेली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील १० हजार १०६ लाभार्थ्यांचा समावेश आहे. हे महामंडळ मराठा तरुणांना उद्योग व्यवसाय विषयी मार्गदर्शन करून स्वतःच्या उद्योग उभा करण्यासाठी बँकांच्या माध्यमातून कर्ज उभारणी व त्यावरील व्याजाचा परतावा देते. तसेच महामंडळ राज्यातील जास्तीत जास्त मराठा तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व लोकमंगल बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित १ लाख मराठा उद्योजक संकल्पपूर्ती निमित्त मराठा उद्योजक मेळाव्यात महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख, नगरसेवक अनिल शिंदे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे विभागीय प्रमुख संकेत लोहार, जिल्हा समन्वयक योगेश वाघ, सुनिल रसाळे, श्रीकांत डांगे, सुधाकर महाराज इंगळे, दिलीप कोल्हे, अनंत जाधव, हरिभाऊ चौगुले, लक्ष्मण महाराज चव्हाण, दास शेळके व अन्य मान्यवर उपस्थित होते.




नरेंद्र पाटील पुढे म्हणाले की, महामंडळाच्या माध्यमातून तरुणांनी आपल्या गावातच उद्योग व्यवसाय उभे करावे. त्यातून रोजगार निर्मिती करून आपल्या गावातील एकही बेरोजगार तरुण रोजगारासाठी बाहेर जाणार नाही यासाठी प्रयत्न करावेत.

**उद्योग उभारणीसाठी मोठा निधी आवश्यक असतो बँकांकडून हा निधी मिळाला तरी त्याच्यावरील व्याजामुळे उद्योजक हैराण होतात. अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून उद्योजकांना कर्जावरील व्याजाचा परतावा देण्यात येतो. त्यामुळे उद्योजकांना खूप मोठा आधार मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यात दहा हजार एकशे सहा लाभार्थ्यांनी महामंडळाच्या योजनांच्या माध्यमातून ८७० कोटीचा कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या कर्जावरील व्याजाचा ८० कोटीचा परतावा आत्तापर्यंत लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे. त्यामुळे महामंडळाच्या या योजना मराठा तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी खूप मोठा आधार ठरत असल्याचे मत श्री. पाटील यांनी व्यक्त केले.**

महामंडळ शेती आणि शेतीपूरक उद्योग व्यवसायासाठी प्रयत्न करत आहे. तरुणांनी पुढे येऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊन उद्योजक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

### एक लाख मराठा उद्योजक संकल्प पूर्ती निमित्त मराठा उद्योजक मेळाव्याचे उद्घाटन

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त तरूणांनी घेऊन आपले गाव व जिल्हा समृध्द करण्याचे काम तरुणांनी करावे. आपल्या गावात स्वच्छेचे काम, बालसंस्कार, शिक्षण, शाळा लोकसहभागातून सोलापूर जिल्हा समृध्द करण्याचे काम प्रत्येक तरूणाने करून भविष्यात एक उद्योजक ते दहा उद्योजक हे उदिष्ट मनात ठेवुन आपण शासनाच्या योजनांचा पुरेपुर लाभ घ्यावा, असेही आवाहन श्री. पाटील यांनी केले.

यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी कृषि पर्यटनासाठी आपला जिल्हा प्रसिध्द झाला पाहीजे. धार्मिक पर्यटन विकासामध्ये आपला जिल्हा पहिल्या पाच मध्ये आला पाहिजे. शेती प्रक्रिया उद्योगात आपले गाव व जिल्हा समृध्द होऊन पुढे कसे जाईल अशा प्रकारची शक्ती प्रत्येकाच्या मनात जागृत झाली पाहिजे. प्रत्येक गावातील नागरिकांनी एकत्र येऊन गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देऊन आपला जिल्हा ही समृध्द करण्याचे काम करावे. तसेच जास्तीत जास्त तरूणांना उद्योजक बनवून मुख्य प्रवाहात आणण्याचे काम अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांतून केले जात आहे. तरी तरुणांनी या योजनांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून मेळाव्यास सुरुवात झाली. यावेळी यशस्वी उद्योजकांचा सत्कार महामंडळाचे अध्यक्ष श्री. पाटील, आमदार सुभाष देशमुख व अन्य मान्यवरांच्या हस्ते करून काही उद्योजकांना १५ लाख रुपये कर्जाच्या मंजुरीचे धनादेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक योगेश वाघ यांनी केले तर विभागीय प्रमुख संकेत लोहार यांनी आभार मानले.

## मुख्यमंत्र्यामुळेच पंचवीस वर्षापासून रखडलेला हिवरवाडी रस्ता झाला : जिल्हाप्रमुख महेश चिवटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

करमाळा हिवरवाडी रस्ता गेली २५ वर्षापासून दूर अवस्थेत होता. या रस्त्यासाठी ३०० लहान विद्यार्थी व विद्यार्थिनी येण्यास रस्ता रोको आंदोलन केले बांधकाम विभागाच्या कार्यालयापुढे आमरण उपोषण केले पण कुठल्याही तालुक्यातील पुढाऱ्यांनी दखल घेतली नाही मात्र या विद्यार्थ्यांची हाक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऐकून या रस्त्यासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर केला व आज या रस्त्याचे काम सुरू झाले आहे असे स्पष्ट मत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश शिंदे यांनी व्यक्त केले.



करमाळा हिवरवाडी रस्त्याचे आज भूमि पूजन जिल्हाध्यक्ष रमेश कांबळे. भोसे चे माजी सरपंच भोजराज सुरवसे हिवरवाडीची सरपंच दत्तू येरकर माजी सरपंच नामदेव इरकर, बाळासाहेब पवार, चतुर्भुज इरकर, बाळासाहेब सुरवसे, विलास रोडगे, रघुनाथ काळे, गणेश नवरे, नंदू इरकर, शिवसेना शाखाप्रमुख आजिनाथ इरकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील अधिसळ शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित यांचे स्वागत शिवरवाडी चे ग्रामपंचायत सदस्य जयराज चिवटे माजी सरपंच राजेंद्र मेरगळ यांनी केली.

## विधानसभा निवडणुकीपूर्वी प्रशांत परिचारक, भगीरथ भालके एकाच व्यासपीठावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे प्रत्येक उमेदवार आपल्या आपल्या पद्धतीने कामाला लागले आहेत पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातून इच्छुक उमेदवार भगीरथ भालके यांनी मतदारसंघात जन आशीर्वाद यात्रा सुरू केली आहे. याच मतदारसंघातून माजी आमदार प्रशांत परिचारक हे देखील इच्छुक आहेत मात्र एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असणारे भालके व परिचारक आज मंगळवेढ्याच्या एकाच व्यासपीठावर आले आहेत व श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या राज्य सरकारच्या माध्यमातून ९४ कोटी रुपये कर्ज मिळवून दिल्याबद्दल माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचा सत्कार ठेवण्यात आला होता या कार्यक्रमात भगीरथ भालके हे जन आशीर्वाद यात्रा सोडून उपस्थित होते. बारक्याने परिचारक यांचा एकच हार घालून यावेळी सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी आयोजकांनी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांची भावी आमदार असाही उल्लेख करण्यात आला.



यावेळी बोलताना बघितली म्हणाले की कार्यक्रम सुरू असतानाच पाऊस सुरू झाला आहे मंगळवेढासाठी शुभ संकेत आहेत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी त्यांच्या सरकारला धारेवर धरून कारखान्याच्या मदत मिळवून दिली मदत मिळू नये म्हणून काही लोकांनी देव पाण्यात ठेवले होते. त्यांनी समाधान आवताडे यांच्यावर नाव न घेता टीका केली आणि दोन वर्षांपूर्वी परिचारक आणि बालके यांनी दामाजी कारखान्यावर समविचारी आघाडी निर्माण करून कारखाना दोघांनी ताब्यात घेतला आज मी जरी कार्यक्रमाला आलो नसतो तरी काहींनी वेगळा अर्थ काढला असता म्हणून जन आशीर्वाद यात्रा सोडून मी कार्यक्रमाला आलो यावेळी भगीरथ भालकी यांनी राज्य सरकारवर टीका करणे टाळले व मी सरकारला सरकारवर टीका केली तर प्रशांतराव परीक्षा अडचणी अशी मुश्किल टिपणी यावेळेस त्यांनी केली.

## इंदापूर विधानसभेसाठी इच्छुक; प्रवीण माने यांनी घेतली शरद पवारांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे

पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम आणि आरोग्य सभापती प्रवीण माने यांनी आज शनिवारी दि.२१ सप्टेंबर रोजी बारामती मध्ये माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांची भेट घेत इंदापूर विधानसभेतून उमेदवारीची मागणी केली आहे. यावेळी सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने देखील उपस्थित होते.



प्रवीण माने म्हणाले की,बारामती मध्ये साहेबांचा आशीर्वाद घेण्यासाठी सदिच्छा भेट घेतली आहे त्यासाठी बारामतीत आलो होतो.

नेहमीच साहेबांचा आशीर्वाद घेण्यासाठी बारामतीत येत असतो. साहेबांसोबत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. उजनी धरणाच्या पाण्याची स्थिती चाऱ्याचा प्रश्न दुधाचे प्रश्न या संदर्भात साहेबांनी माझ्याकडून माहिती घेतली.

विधानसभेसाठी मी इच्छुक आहे. साहेबांना देखील मी सांगितलं की मी इच्छुक आहे. साहेब जो निर्णय सांगतील तो सर्वांना मान्य असेल. साहेबांनी माझी भूमिका ऐकून घेतली प्रत्येक उमेदवाराला वाटत असतं की आपल्याला उमेदवारी मिळावी. हर्षवर्धन पाटलांबाबत मला काही माहीत नाही.मी फक्त मिडियातून ऐकत आहे.

आप्पासाहेब जगदाळे यांना उमेदवारी देण्यात यावी या संदर्भात पाठीमागे शिष्टमंडळ शरद पवार यांना भेटले या संदर्भात प्रश्न विचारला असता माने म्हणाले की,प्रत्येकाला वाटत असतं आपल्याला उमेदवारी मिळावी शिष्टमंडळ भेटत असतं आमचा पक्ष हेच आमचं शिष्टमंडळ आहे असं आम्ही माणतो.सर्वकाही जनतेच्या हातात आहे आमच्या हातात नाही. शरद पवार सांगतील तेच धोरण आणि तोरण असेल.

## घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत विविध प्रसंगात आपले कौशल्य दाखवतात ते खरोखर प्रेरणादायी आहे : अनिल सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महिला घरच्या जबाबदारी सांभाळून विविध प्रसंगात आपले कौशल्य दाखवतात हे खरोखर प्रेरणादायी आहे आजचा दिवस ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत खास आहे कारण आपण सगळे एकत्र येऊन होम मिनिस्टर खेळ व पैठणीचा या कार्यक्रमाच्या आनंद लुटत आहात वेळ कार्यक्रमासाठी फक्त मनोरंजनासाठी नाहीतर आपणा सर्वांच्या कलेला अनेक कौशल्येला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे आपण आपल्या घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत विविध प्रसंगात आपली कौशल्य दाखवत हे खरोखर प्रेरणादायी असल्याचे फायदे भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांनी केले.

आपल्या लाडक्या वहिनी साठी व नारीशक्तींच्या सन्मान करण्यासाठी बुधवार दिनांक १८ रोजी दुपारी चार वाजता जोगेश्वरी मंगल कार्यालय पंढरपूर सोलापूर बायपास रोड मंगळवेढा येथे होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते व त्या कार्यक्रमासाठी प्रसंगी सावंत बोलत होते

यावेळी ठिपक्यांची रांगोळी या मालिकेतील अनेक अभिनेत्री लाडकी अप्पू व ज्ञानदा रामतीर्थकर सेलिब्रिटी अँकर आरजे अक्षय यांनी प्रमुख उपस्थिती लावली होती

पुढे बोलताना ते म्हणाले की मी आज गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून पंढरपूर मध्ये राहत असून मंगळवेढा आणि पंढरपूर या तालुक्यातील काम करत आहे भैरवनाथ शुगर उद्योग समाजाच्या माध्यमातून हे काम करत असताना शेतकरी वर्गाची हीच हीच मुख्य उद्दिष्ट ठेवूनच आतापर्यंत आम्ही काम करीत आलेलो आहे

तसेच मी स्वतः वारकरी संप्रदायाला असून मरकरी संप्रदायाविषयी आरोग्यासाठी मी भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात काम केलेले आहे तरी आज या माध्यमातून काम करत असताना अधिकच काम करण्यासाठी महिलांसाठी लहान मुलांचे शिक्षणासाठी व शेतकऱ्यांसाठी तसेच तरुण उद्योगांसाठी मला काम करणे संधी या मतदारसंघातून मिळावी अशी मी अशा व्यक्त केली व होम मिनिस्टर बद्दल बोलताना सावंत म्हणाले की हा खेळ तितकाच लोकप्रिय आहे कारण त्यातून महिलांच्या सुरजनशीलतेचा आणि कुटुंबातल्या महत्त्वपूर्ण भूमिकेला अधोरेखित करण्याची संधी मिळते व पैठणी ही नुसतीच एक साडी नेसून महाराष्ट्रातील तमाम महिलांना वर्गासाठी विशेष प्रेरणा देणारे आहे कारण पैठणी ही आपल्या सांस्कृतिक ओळख आहे ही फक्त एक वस्त्र नाही तर एक परंपराग अभिमान आहे आपण सगळे याच्या या कार्यक्रमाला एक भाग आहात याचा मला मुख्य आनंद होत आहे प्रत्येक सहभागी महिलांचे अभिनंदन करतो आणि आपल्या कौशल्याला सलाम करतो

माझ्या सर्वांनी शुभेच्छा आहेत व ही आजचा दिवस आपल्यासाठी विस्मरणीय ठरेल खेळाचा आनंद लुटा आणि आपले वर्तमान सर्वोत्तम प्रयत्न करा असे शेवटी सावंत मनाने भारत पुढे यांनी सूत्रसंचालन केले.

**चतुर्थ श्रेणीबाबत सरकारचा दुटप्पीपणा** — मागण्या मान्य न झाल्यास २६ तारखेपासून मुंबईत आझाद मैदानावर करणार आंदोलन

# चतुर्थ श्रेणीसाठी कोतवालांचे राज्यात बेमुदत संपाची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी

राज्यातील कोतवालांनी चतुर्थ चा दर्जा आणि इतर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आक्रमक भूमिका घेतली असून मंगळवार दिनांक २४ राज्यभरात जिल्हास्तरीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

२५ तारखेपासून राज्यभर काम बंद आंदोलन सुरू करण्यात येणार असून गुरुवारपासून दि २६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे महसूल प्रशासनातील कोतवाल महत्त्वाचे घटक आहेत मसूर गोळा करणे निवडणूक प्रक्रियेत व स्थानिक पातळीवरील नित्य नियमाची कामे पार पाडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात अशा विविध जबाबदाऱ्या पार पडत असून कोतवालाना अद्याप पर्यंत चतुर्थ श्रेणी चा दर्जा मिळाला नाही त्यामुळे त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन आणि सुविधा मिळत नाही कोतवाल संघटनेच्या माहितीनुसार या मागण्यावर कोणतीही प्रभावी कारवाई झाली नाही त्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलेला आहे राज्यातील हजारो कोतवाले आंदोलनात सहभागी होणार असून आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरू असणार आहे अशी माहिती जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव यांनी दिली.

**कोतवाल महसूल विभागातील शेवटचा भाग आहे. तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत जाऊन प्रत्येकाच्या शंकेचे निरसन करणे, महसूल गोळा करणे, गौणखनीज आळा बसविणे, निवडणूक कामकाज, नैसर्गिक आपत्ती, पीक पाणी, दुष्काळात नुकसान भरपाई, पंचनामाचे सर्वेक्षण, करणे स्थानिक पातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी पोलीस पाटील व पोलीस प्रशासनास मदत करणे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांना सहाय्य करणे अशा अनेक कामकाजात कोतवाल हा अत्यंत महत्त्वाचा घटक समजला जातो. मात्र, हा कोतवाल साठ वर्षापासून चतुर्थ श्रेणीसाठी सतत झगडत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महसूल मंत्री यांनी तातडीने बैठक घेऊन कोतवालांचा विषय निघाली काढावा अन्यथा होणाऱ्या नुकसान राज्य शासन स्वतः जबाबदार राहणार आहे. त्यामुळे तातडीने बैठक घेऊन गेल्या पन्नास वर्षांपासून च्या मागणीचा निर्णय व्हावा अशी मागणी सध्या जोरदार आहे.**

कोतवाल हा महसूल यंत्रणेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे मात्र कोतवालाना अद्याप चतुर्थ श्रेणी प्राप्त झालेली नाही यासाठी मंगळवारपासून सोलापूर जिल्हा कोतवाल संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

येत्या मंगळवारी २४ रोजी जिल्हा परिषद येथील पूनम गेट येथे एकदिवशी धरणे आंदोलन त्यानंतर बुधवारी २५ पासून राज्यभरात काम बंद आंदोलन करणार असून, जर या दोन दिवसात शासनाने दाखल न घेतल्यास दि.२६ पासून मुंबई येथील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरु करण्यात येणार आहे.

या आंदोलन यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव, अनिल जाधव सरचिटणीस, मलिनाथ बाळगी राहुल तोडकरी, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रविणकुमार बाबर, भगवान पारशी, समाधान सुरयंगध, गौतम ठोकळे धानया स्वामी, अवधूत पुजारी, शफीक वाडीकर, राजेंद्र कुंभार इरणा कांबळे, कृष्णा शिंदे, बाळासाहेब सरवदे, बालाजी वहळे, बंडु मडवळकर, शहाजी हुगंगे, इतर पदाधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील ५४७ कोतवाल हे आंदोलनात सहभागी होणार आहेत अशी माहिती जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव यांनी दिली.

## घोळसगाव मराठी शाळेस आदर्श शाळा पुरस्कार सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी

अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक संघ मर्या.अक्कलकोट यांच्यातर्फे आचार्य दोंदे पुरस्काराचे वितरण करण्यात आले. हा पुरस्कार सौ शांभवी सचिन कल्याणशेट्टी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे व वीरभद्र यादवाड यांचे हस्ते देण्यात आले. घोळसगाव शाळेतील झालेला बदल, गुणवत्ता, शालेय परिसर, रंगरंगोटी आणि विविध उपक्रम याची दखल तालुकास्तरावर घेऊन तालुकास्तरीय पुरस्कार देण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री रामेश्वर पाटील, उपाध्यक्ष अब्दुल फकीर, अल्ताफ फकीर तसेच शाळेचे माजी विद्यार्थी प्रशांत पटणे व खंडेराव साळुंखे शाळेतील शिक्षक श्री रामेश्वर दरेकर , श्री अमोल गुंजोटे, श्री अजित ठाकर, श्री मुरलीधर वागदकर आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री सोमनाथ मोरे कन्नड शाळेचे मुख्याध्यापक रेवणसिद्ध नागुरे नागराज पाटील उपस्थित होते.